**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता**
**अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये**
**नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देणेबाबत.**
**(न्यायालयीन प्रकरण)**

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**शासन निर्णय क्रमांक: न्यायाप्र-२०२५/ई- १४६६०४७/ मशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक: १६ एप्रिल, २०२६ .

**संदर्भ**: १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७

३. रिट याचिका क्र. ७०४४/२०२५ प्रकरणी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांचे दिनांक १६.१२.२०२५ रोजीचे आदेश.

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाअंतर्गत मॉ. सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी महिला महाविद्यालय, मु. मारेगाव, ता. मारेगाव, जि. यवतमाळ या महाविद्यालयातील बी.ए. इन फॅशन डिझाईन व बॅचलर ऑफ सायन्स (क्लिनिकल लॅबोरेटरी सायन्स) बी.एस्सी. सी.एल.एस. या नवीन अभ्यासक्रमांना मान्यता नाकारल्यामुळे संबंधित संस्थेने मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ७०४४/२०२५ दाखल केली होती. सदर याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विस्तारीकरणांतर्गत मॉ. सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या श्री शिवाजी महिला महाविद्यालय, मु. मारेगाव, ता. मारेगाव, जि. यवतमाळ या महाविद्यालयातील बी.ए. इन फॅशन डिझाईन व बॅचलर ऑफ सायन्स (क्लिनिकल लॅबोरेटरी सायन्स) या नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्रमांक ७०४४/२०२५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६.१२.२०२५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून मॉ. सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी महिला महाविद्यालय, मु. मारेगाव, ता. मारेगाव, जि. यवतमाळ या महाविद्यालयास सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे बी.ए. इन फॅशन डिझाईन व बॅचलर ऑफ सायन्स (क्लिनिकल लॅबोरेटरी सायन्स) हे नवीन अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती :**

i. ज्या अनुदानित महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या **कायम विनाअनुदान तत्वावरील** असल्याने, सदर मान्यतेच्या अनुषंगाने अशा महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मागणी करता येणार नाही.

ii. संबंधित महाविद्यालयाने संबंधित विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत, असे हमीपत्र रु. ५००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

iii. मान्यता मिळालेल्या तुकडी, विद्याशाखा व अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयाने संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र प्रमाणित करून विद्यापीठास द्यावे.

iv. महाविद्यालयाने/संस्थेने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ॲफिलिएशन ऑफ

कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज रेग्युलेशन २००९ मध्ये संलग्नीकरण देण्याबाबत विहित केलेल्या निकषांची पूर्तता केल्याशिवाय, संलग्नीकरण देण्याची कार्यवाही संबंधित विद्यापीठांनी करू नये.

v. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

vi. संबंधित विद्यापीठाने प्रस्तुत शासन निर्णयाचे अवलोकन केल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. संबंधित विद्यापीठाने संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

vii. संबंधित विद्यापीठाने व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने नियतकालिक आढावा घेऊन सदर नवीन अभ्यासक्रमांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर नवीन अभ्यासक्रमांची मान्यता रद्द समजून तसे आदेश संबंधित विभागीय सहसंचालकांनी काढावेत व ते शासन व संबंधित विद्यापीठाकडे पाठवावेत.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१६१८१५३९५९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.04.16 18:18:48 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगरविकास, गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४.मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (उ.व तं.शि.वि.), मंत्रालय, मुंबई,
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
१०. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.
११. संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत)
१२. निवडनस्ती (मशि-४)

**न्यायाप्र-२०२५/ई- १४६६०४७/ मशि-४, दिनांक १६ एप्रिल २०२६ सोबतचे विवरणपत्र-अ**

| अ.क्र. | संस्था/महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम/विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा |
|---|---|---|
| **श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.** | | |
| १. | मॉ. सरस्वती बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. शिवाजी महिला महाविद्यालय, मु. मारेगाव, ता. मारेगाव, जि. यवतमाळ. | **नवीन अभ्यासक्रम**<br>१. बी.ए. इन फॅशन डिझाईन.<br>२. बॅचलर ऑफ सायन्स (क्लिनिकल लॅबोरेटरी सायन्स) बी.एस्सी. सी.एल.एस. |

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=fabb29d28cdbcbe5c9eed052cb38b8cb567068a0090e237f095c6e50a52a6cf5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.04.16 18:19:08 +05'30'